आरबीआय २००४/४२

डीबीओडी सं. बी.पी.बी.सी. ६६/२१.०४.११७/२००३-०४

०५ फेब्रुवारी २००४

अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका,

प्रिय महोदय,

**सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच्या रु. १० कोटी पर्यंतच्या दीर्घकालीन अनुपयोज्य मालमत्तेच्या तडजोड समझोत्या संदर्भात सुधारित अनुदेश**

आमच्या दिनांक २३ मे २००३च्या डीबीओडी सं. बी.पी.बी.सी. १०८/२१.०४.११७ / २००२-२००३ च्या रु. १० करोड पर्यंतच्या अनुपयोज्य मालमत्तेच्या तडजोड संदर्भातील आवेदन प्रक्रिया पूर्ण करण्याचा कालावधी वाढविण्या बद्दलच्या परिपत्रकाचे अवलोकन करावे.

२. या संदर्भातील अनुदेश कार्यान्वित करण्याचा कालावधी वाढविण्या साठी मिळालेल्या विनंत्यांचा विचार करुन, भारत शासनाशी विचार विनिमय करुन, असे ठरविण्यात आले आहे की सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच्या रु. १० करोड पर्यंतच्या दीर्घ मुदती अनुपयोज्य मालपेत्तेच्या एक रकमी तडजोडी साठीची आवेदन पत्रे, ३१ जुलै २००४ पर्यंत स्वीकारली जावीत. परिणामी, ३० जुलै २००४ पर्यंत स्वीकारलेली आवेदन पत्रे शेवटची तारीख ही ३१ ऑक्टोबर २००४ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

३. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू
(सी. आर. मुरलीधरन)
प्रभारी मुख्य महा व्यवस्थापक